४३१-

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १२४/प्रनिप्रा/११८३ दिनांक : 12 MAY 2022

**बैठकीचे इतिवृत्त**

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ५३व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व २) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ४) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. व ५) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व २) श्री. जयंत पाटील, सहाय्यक परिक्षा समन्वयक, उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईकसंचालनालय, पुणे हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १८/०४/२०२२ | दुपारी १२:०० वा. | उच्च शिक्षण | एल.एल.बी. - ५ वर्षे (इंटिग्रेटेड) |
| | | दुपारी ०३:०० वा. | | एल.एल.बी. - ३ वर्षे |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State
१०/५/२२

विषयांकित अभ्यासक्रमामध्ये एकूण २७९ (एल.एल.बी.-५ वर्षे = १३२ + एल.एल.बी.-३ वर्षे = १४७) महाविद्यालये होती. सदर महाविद्यालयांचा प्रवेश पडताळणी अहवाल संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक १६/०४/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे प्राप्त झाला. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५, कलम ९(५) मधील तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करणे अनिवार्य आहे. सदरील महाविद्यालयांकडून तसा प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे संबंधीत महाविद्यालयांचे प्रवेश अमान्य करण्यात येत आहे.

संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सादर केलेल्या माहितीनुसार खालील महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार विहित वेळेत सादर केलेले नाहीत. सबब सदर महाविद्यालयांनी रु. १ लाख दंड प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे भरणा करावा, संबंधीत महाविद्यालयांनी दंडाच्या रकमेचा भरणा केल्याची खातरजमा करुन संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी त्यांचे प्रवेश पडताळणी करावी. संबंधीत महाविद्यालयांकडून रितसर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणासमोर मान्यतेस सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. महाविद्यालयांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | महाविद्यालयाचा कोड | महाविद्यालयाचे नाव | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| | | **अभ्यासक्रम : विधी - ५ वर्षे** | | |
| १) | १२८२१००२ | स्व. एम.एल.सी. वसंतरावजी काळे विधी महाविद्यालय, औरंगाबाद. | ६६ | २६ |
| २) | २४७२१००६ | रिझवी विधी कॉलेज, मुंबई | १२० | १२० |
| ३) | १०८२१००४ | विनायक विधी महाविद्यालय, अमरावती. | १३२ | १० |
| एकुण : | | | ३१८ | १५६ |
| | | **अभ्यासक्रम : विधी - ३ वर्षे** | | |
| ४) | १२८२१००२ | स्व. एम.एल.सी. वसंतरावजी काळे विधी महाविद्यालय, औरंगाबाद. | ६६ | ६६ |
| ५) | १४५२१००१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय (City Branch) | ६६ | ६१ |
| ६) | १४५२१००२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय (Main Branch) | ६६ | ६५ |
| ७) | २४४२१००२ | सिदधार्थ विधी महाविद्यालय, मुंबई | २६४ | २६१ |
| ८) | २५८२२००१ | पार्वतीबाई जोंधळे महिलांचे विधी महाविद्यालय. | ६६ | ६० |
| ९) | २४७२१००७ | रिझवी विधी महाविद्यालय, मुंबई | १८० | १८० |
| एकुण : | | | ७०८ | ६९३ |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

ARA/18th April 2022
Meeting No. 53

विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेल्या आहेत, या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्णयानुसार गठित करण्यात आलेल्या भोसले समितीतील अहवालामध्ये शिफारस केल्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मानधन अदा करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतचा खर्च दोन्ही विभागांच्या स्वतंत्र लेख्यामधून करण्यात यावा.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे व प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी माहिती/अहवाल सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से. १०/५/२२
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १०/५/२२